**विषयः-** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी
प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत.
(**बँक, पोस्ट ऑफीस व एटीएम मधील ग्राहकांची गर्दी नियंत्रित करणेबाबत**)

## जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड

क्र.२०२०/आरबी-१/डे-२/टे-४ /कोरोना/सीआर-
दि. १७/०३/२०२०

वाचाः-१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/ आरोग्य-५ दि.१५.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे कलम २,३ व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य ५ दि.१४ मार्च, २०२०.

**आदेशः-**

ज्याअर्थी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

आणि त्याअर्थी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे त्यानुसार जिल्हयात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी दिनांक ३१ मार्च,२०२० पर्यंत नांदेड जिल्हयातील सर्व पोस्ट ऑफीस, बँकामध्ये मुख्य प्रवेशव्दारावर गार्ड नेमण्यात यावा व पोस्ट ऑफीस व बँकेत जाणारे ग्राहक हे कामकाज चालु असलेल्या एका काउंटरवर एका वेळी एकच ग्राहक हजर राहील याची दक्षता घ्यावी तसेच, उर्वरीत ग्राहकांना पोस्ट ऑफीस, बँकेच्या बाहेर दोन ते तीन फुटाचे अंतरावर थांबण्याची व्यवस्था करावी, व पोस्ट ऑफीस, बँकेच्या प्रत्येक एटीएम समोर एक गार्ड नेमुन

एटीएम मध्ये एका वेळी एकच ग्राहक प्रवेश करील व उर्वरीत ग्राहकांना दोन ते तीन फुटाचे अंतरावर थांबण्यास सांगावे.

या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, नांदेड, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड, व डाकघर अधीक्षक, मुख्य पोस्ट ऑफीस, यांची राहील त्यांनी याबाबत त्यांचे यत्रणेमार्फत वेळोवेळी पहाणी करुन अहवाल सादर करावा.

स्वा/-
(डॉ. विपीन इटनकर) भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
४) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
५) पोलीस अधीक्षक, नांदेड
६) व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, नांदेड
७) डाकघर अधीक्षक, मुख्य पोस्ट ऑफीस, शिवाजी पुतळा जवळ, नांदेड
८) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड
९) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
१०) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

जिल्हादंडाधिकारी, नांदेड